दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १२ जुले २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये




# महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात मोठा भूकंप होणार? नेमका दावा काय?

**वादळवार्ता/विशेष**

महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात अनेक घडामोडी घडणार आहेत. या घडामोडींबाबत वेगवेगळे दावे अनेकांकडून केले जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या 5 वर्षांत अनपेक्षित अशा अनेक घडामोडी बघायला मिळाल्या. त्यामुळे आगामी काळातदेखील अनपेक्षित घडामोडी घडताना दिसू शकतात. कारण आगामी काळात राज्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली आहे. पण आता आगामी काळात राज्यातील महायुतीत भूकंप होईल,



असा मोठा दावा काँग्रेस नेते कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. त्यांनी केलेल्या दाव्यानुसारत महायुतीत खरंच भूकंप झाला तर राज्याच्या राजकारणात पुन्हा ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. महायुतीच्या विधानसभा निवडणुकीच्या आगामी जागावाटपावर कैलास गोरंट्याल यांनी प्रतिक्रिया दिली. “मी यावर आज तर काही बोलू शकत नाही. पण उद्या महायुतीत मोठा भूकंप येईल. तुम्हाला माहिती आहे की, विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा एक उमेदवार पडणार आहे. त्यानंतर आपण बोलू की, कुणाला किती जागा मिळतील. आता कुणाला किती ताकद आहे ते लोकसभा निवडणुकीत दिसली आहे. ज्याची ताकद आहे त्याला देणार”, असा दावा कैलास गोरंट्याल यांनी केला.

“हे वरतून चाललं आहे. त्यांनाही कळलं आहे. तिकीट वाटप भले इथे असेल, पण तिकीट देणारे भाजपचे केंद्रातले मोठे नेते आहेत. भाजप 160 तिकीट शंभर टक्के घेईल. तर इतर दोन पक्षांची जेवढी ताकद आहे तितक्या जागा त्यांना मिळतील. महायुतीच्या जागावाटपामुळे महाराष्ट्रात बंडखोरी जास्त होईल. कारण प्रत्येक मतदारसंघात शिंदे गटाचा माणूस तयार आहे, अजित पवार गटाचा माणूस तयार आहे, तसेच भाजपचे जुने कार्यकर्ते तयार आहेत. बंडखोरी फार मोठ्या प्रमाणात होईल”, असा मोठा दावा कैलास गोरंट्याल यांनी केला.




## कव्हे येथे रंगला संत एकनाथ महाराज पालखीचा रिंगण सोहळा...



**सोलापूर/विश्वास चोपडे**

दरवर्षीप्रमाणे कव्हे येथील श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळा कव्हे येथून पंढरपूरच्या विठ्ठल दर्शनासाठी पायी चालत जातो रात्री बिटरगाव येथे मुक्काम झाल्यानंतर सकाळी दिनांक ११ जुलै २०२४ रोजी ही पालखी कव्हे येथे आली. पालखीला आणण्यासाठी गावातील वारकरी गावकरी मंडळी टाळ मृदुंग या गजरात पालखीला आणण्यासाठी शिवेवर जातात तिथून पालखीला टाळ मृदुंग या गजरामध्ये आणली जाते. विशेष म्हणजे आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांची ड्युटी निभावत पालखीच्या पुढे फुलांचा वर्षाव करत पालखीचे स्वागत केले गावामध्ये ठिकठिकाणी चहा नाश्ता दूध अशाप्रकारे वारकरी यांचा पाहुणचार केला. ही पालखी मारुती मंदिरामध्ये भक्तांच्या दर्शनासाठी दरवर्षीप्रमाणे ठेवण्यात येथे.त्यानंतर पालखीच्या वाट्यावर नेण्यात आली त्या ठिकाणी संत एकनाथ महाराज पालखीचे भव्य दिव्य असे अश्व रिंगण सोहळा संपन्न झाला त्यावेळी अभंग भारुड गवळणी भानुदास एकनाथ जयघोष करत व फुगडी घालत रिंगण सोहळा साथ दिली.

त्यानंतर गावकऱ्यांकडून जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. जेवणाचा आस्वाद घेऊन पालखी तिथून विठ्ठल नामाचा जयघोष करत पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी ज्वारीच्या भाकरी-पिठलं यांचा भव्य महाप्रसाद



**नांदेड/प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आळंदी ते पंढरपूर या सोहळ्यासाठी अनेक भाविकांचं मोठं योगदान लावत असतं आणि लाखो वारकरी सध्या मदर मदर करत पायी पालखी सोहळ्यात वारीत असतात या वारकऱ्यांसाठी ह भ प भारत विश्वनाथ रामीनवार यांच्यावतीने गेल्या १९ वर्षापासून ९० क्विंटल ज्वारीच्या भाकरी व पिठलं वारकऱ्यांना महाप्रसाद म्हणून वाटप केले जाते यांच्यावतीने नातेपुते लगत पूर्वेस दोन किलोमीटर अंतरावर दोनशे स्क्वेअर फुट पेक्षाही मोठा भव्य आणि विस्तीर्ण मंडप उभारण्यात आला होता १००० पेक्षा अधिक महिला भाकरी बनवण्यासाठी उपस्थित होत्या वीस क्विंटन पेक्षा अधिक बेसनचे पिठलं कांदा लिंबू चटणी लोणचं आधी पदार्थ प्रसादासाठी ठेवण्यात आले होते या पिठलं भाकरीचा वारकऱ्यांनी आस्वाद घेतला व सातारा जिल्ह्यातील नातेपुते येथील पालखी स्थळाकडे वारकऱ्यांनी प्रस्थान केले. या अभिनव वारकऱ्यांच्या सेवेसाठी भारत यांचं सहकार्य महत्त्वपूर्ण असतं वारकऱ्यांच्या सेवेसाठी त्यांनी भव्य अन्नदान महाप्रसाद केला गेला या महाप्रसादासाठी नांदेड जिल्ह्यातील अनेक वारकरी महाप्रसाद बनण्यासाठी तत्पर होते

# पार्किंगमधील सहा दुचाकी अज्ञातांनी पेटवल्या

पुणे /पंकज भंडारी राजगुरुनगर (पुणे) : येथे मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात इसमांनी हरिद्वार सोसायटी मधील पार्किंगमध्ये सहा दूचाकी पेटवून देऊन नुकसान केले. दुचाकी पेटवल्याच्या ठिकाणी पेट्रोलसाठी वापरलेली प्लास्टिक बाटली, माचिस पडलेली आढळून आली. तेथील एका दुचाकीचे पेट्रोल काढून अन्य गाड्या जाणीवपूर्वक पेटवून देण्यात आल्या.

सोसायटीतील रहिवाश्यांनी माहिती मिळाल्यावर पाण्याने आग विझवली. अज्ञात आरोपी विरोधात खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे यातील एक दुचाकी ही पोलिस कर्मचारी यांची आहे आहे. तर दोन दुचाक्या पोलिस कर्मचाऱ्याच्या परिवारातील आहेत . आग आटोक्यात आली नसती तर शेजारील वाहनांनी पेट घेतला असता व मोठी दुर्घटना झाली असती. मात्र दुर्घटना टळली आहे. पोलीस प्रशासनाने दखल घेऊन लवकरात लवकर आरोपीचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली.



# ई-केवायसी न केल्यामुळे साडेनऊ हजार शेतकरी अनुदानापासून वंचित
## पैठण तालुका ;अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे झाले होते मोठे नुकसान

**पैठण/चैताली औटे**

दोन वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्याची नुकसानभरपाई म्हणून शासनाने पैठण तालुक्यातील ९४ हजार शेतकऱ्यांकरिता ९५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. परंतु, अद्यापपर्यंत ई-केवायसी न केल्यामुळे तब्बल ९ हजार ५३५ शेतकरी या अनुदानापासून वंचित असल्याची माहिती समोर आली आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर २०२२ मध्ये तालुक्यात अतिवृष्टी झाली होती. यामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. कपाशी पिकाच्या तर वाती झाल्या होत्या. फळबागांचेहीदेखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्याची नुकसानभरपाई म्हणून शासनाने पैठण तालुक्यातील ९४ हजार शेतकऱ्यांकरिता ९५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. या अनुदानासाठी ७२ हजार ६२ शेतकरी पात्र ठरले आहेत. यापैकी अद्यापपर्यंत ६० हजार ५३८ लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप झाले असून, ८३७ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर येत्या सात दिवसांत अनुदान जमा होणार आहे. तर १ हजार १५२ शेतकऱ्यांचे बँकेच्या खात्याशी आधार लिंक नसल्यामुळे ते या अनुदानापासून वंचित आहेत. याशिवाय तहसील कार्यालयाने वेळोवेळी सूचना करूनही दीड वर्ष होऊन गेले तरीही अद्यापपर्यंत ई- केवायसी न केल्यामुळे तब्बल ९ हजार ५३५ शेतकऱ्यांना हे अनुदान मिळालेच नाही. या शेतकऱ्यांची ४२ लाख ४६ हजार ७३० रुपयांची अनुदान रक्कम पडून आहे. या शेतकऱ्यांनी ई- केवायसी करून घेतल्यास त्यांच्या खात्यावर त्वरित अनुदान जमा करण्यात येईल.बागायतीसाठी हेक्टरी २२ हजार ५०० तर कोरडवाहू जमिनीसाठी ८ हजार ५०० रुपये अनुदान शासनाकडून मंजूर केलेले आहे, अशी माहिती अशी माहिती तहसीलदार सारंग चव्हाण यांनी दिली.

ई-केवायसीच्या बाबतीत प्रत्येक गावांत याद्या लावण्यात आल्या आहेत. लाऊडस्पीकरवर दवंडी देण्यात आली आहे. मागील महिन्यात ८३७ शेतकऱ्यांचे नव्याने ई-केवायसी करण्यात आले आहे. त्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर येत्या सात दिवसांत ४३ लाख ७६ हजार रुपये जमा होतील. उर्वरित ९ हजार ५३५ लाभार्थ्यांनी तत्काळ ई- केवायसी करून घ्यावे.
सारंग चव्हाण,तहसीलदार, पैठण

# वेताळवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी जि.प.शाळेत नवीन वर्ग खोल्यांचे आमदार बबनदादा शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

सोलापूर/विश्वास चोपडे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेताळवाडी येथे नवीन वर्गखोलीचे उद्घाटन व दुसऱ्या नवीन वर्ग खोलीचा पायाभरणी समारंभ माढा तालुक्याचे लोकप्रिय आमदार माननीय श्री.बबनदादा शिंदे साहेब यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. सुरुवातीस मान्यवरांचे स्वागत शब्दसुमनाने शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री.मुकुंद तांबिले सर यांनी केले.त्यानंतर माननीय आमदार श्री.बबन दादा शिंदे साहेब यांचा सत्कार डॉ.श्री.मगन सुरवसे सर यांच्या हस्ते करण्यात आला.



त्यासोबतच उपअभियंता माननीय श्री.हांडे साहेब यांचा सत्कार श्री. खोत सर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच शाखा अभियंता श्री. काळेसाहेब यांचा सत्कार श्री. दरलिंग खोत यांच्या हस्ते करण्यात आला. सदर प्रसंगी गावच्या सरपंच सौ.रतन सुरवसे,डॉ.श्री.मगन सुरवसे सर, उपसरपंच प्रतिनिधी श्री. दयानंद जाधव,विकास सोसायटीचे चेअरमन माननीय श्री.राजेश आप्पा खोत,ग्रामपंचायत सदस्य श्री. शहाजी नाना सुरवसे तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माननीय श्री.दादा खोत,उपाध्यक्ष श्री.अमोल सुरवसे,रणजीत सुरवसे, ग्रामसेविका शेंडेकर मॅडम व गावातील ग्रामस्थ व शाळेतील शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री. मुकुंद तांबिले सर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार श्री बाळासाहेब डांगे सर यांनी मानले.

## "तंगाईदृष्य"

“मस्तीराज”
आजी-माजी सत्ताधारी नेत्यांनो
तुम्हां सत्तेची सुटली लय खाज..!
पण लक्ष्यात ठेवा जाता जाता
आमच्या मतानी उतरू तुमची माज..!
आमच्या आया-बहिणीची शिलबंद अब्रू
कुठंही घेतात पाळलेले तुमचे गब्रू...
ह्या लोकांचा बनलाय निर्दयी पिंड
काढतात अबलाची भर रस्त्यात धिंड
हे तुम्ही पाहाताना कशी वाटत नाही लाज..?
माणसांवरच होई हल्ला भरदिवसा गोळीबारं...
अन्य माणसे,शासन बघतात गप्प सारं...
हे असले कसले आहेत क्रूर गुंडे..?
त्यांना पकडा हातपाय तोडून करा तुंडे
निष्ठूर बनून माणूसकी लागले पिळू...
सुव्यवस्था लोकशाही कायदा लागले गिळू...
चला एकीनं घालवू त्यांची मस्तीराज...
आपल्या मतानी उतरू त्यांची माज..!!

महादेव गायकवाड, तंगाईकार.
रुईधारुर जि. बीड.
भ्रं. ८९९९७५०००४.

# महाराष्ट्र प्राईड अवार्डने दत्तात्रय मुजमुले सन्मानित
## जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीने पटकावला मानाचा पुरस्कार




केज/प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिर येथे दिनांक 7 जुलै रोजी राज्यस्तरीय सुपर अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धे दरम्यान अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित करण्यात येते.

महाराष्ट्रात सुपर अबॅकसचे जवळपास सर्वत्र सेंटर्स आहेत. त्यामध्ये अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निवडक सेंटर्सना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्ड दिला जातो त्यामध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

हा अवॉर्ड प्रदान करण्यासाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ पायल चौबे , शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर छत्रपती संभाजी नगर राजेंद्र जंजाळ,सुपर अबॅकसचे सर्वेसर्वा मनीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# डॉ.बाबुराव जोगदंड यांचा वाढदिवस चौसाळा येथे विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**बीड/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील नामांकित शिक्षण संस्था गुरु महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा या संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉक्टर बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस शाळेच्या मैदानावर विविध शैक्षणिक उपक्रमांनी संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष एडवोकेट रामेश्वर जी काशीद प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी शिंदे, संस्थेचे शालेय समिती सदस्य उमेश आंधळे, शालेय समिती सदस्य संभाजी आबा जोगदंड, उमेश जोगदंड चेअरमन सेवा सहकारी सोसायटी तसेच घरत नाना ,अविनाश मुंडे ,संभाजी आंधळे ,सिद्धेश्वर हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. वाढदिवसानिमित्त घरत नाना यांच्यातर्फे शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना लिहिण्याचे पॅड वाटप करण्यात आले तसेच संभाजी आबा जोगदंड उमेश रावजी आंधळे, उमेश जोगदंड यांच्यावतीने सर्व विद्यार्थ्यांना वॉटर बॅग याचं वाटप करण्यात आल्या तसेच शाळेतील शिक्षक वृंदांच्यावतीने अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडी संपूर्ण गावातून काढून डॉक्टर साहेबांसाठी परमेश्वराकडे उदंड आयुष्य व यश कीर्ती लाभो



असे साकडे घातले पालक वर्गातून व विद्यार्थ्यांकडून शुभेच्छा व मनोगतातून डॉक्टर साहेब बद्दल गौरव उद्गार व समाधान व्यक्त करण्यात आले. ग्रंथ दिंडीची सांगता या ज्ञान पंढरीच्या चिमुकल्या वारकऱ्याकडून विविध अभंग भारुड गवळणी व रिंगण अशा विविध उपक्रमांमधून व अभिनय नृत्यातून आपल्या कलागुणांचा अविष्कार दाखवण्यात आला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक शाळेचे मुख्याध्यापक श्रीमंत चौधरी सर यांनी प्रस्ताविका मधून डॉक्टर साहेब यांची शाळेबद्दलची स्वप्न सांगताना शाळेतील प्रयोगशाळा ग्रंथालय क्रीडांगण संगणक कक्ष याबरोबरच गुणवत्ता पूर्ण शिक्षण व सुजान नागरिक घडवण्याबद्दलचं साहेबांचं स्वप्न आम्ही साकार करू अशी ग्वाही दिली व साहेबांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर ,श्री घोडके सर ,श्री मोटे सर, श्रीमती साबणे ,मॅडम श्री राठोड सर, श्री लिमकर सर ,श्री गुरव सर, श्री वैद्य सर ,बाळासाहेब जाधव यांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व शिक्षक वृंदांच्या परिश्रमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते त्याचा आस्वाद उपस्थित विद्यार्थी पालक मान्यवरांनी घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली

# पूजा खेडकर प्रकरणाची केंद्र सरकारकडून गंभीर दखल, समिती नेमली, नियुक्तीवर तपास होणार

**परळी /प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी IAS अधिकारी पूजा खेडकर यांच्या नियुक्तीवर अनेक आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांवरुन वातावरण तापल्यानंतर आता केंद्र सरकारकडून पूजा खेडकर यांच्या नियुक्तीबद्दल तपास केला जाणार आहे. पूजा खेडकर यांच्यावरील आरोपांवर तपास करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून अतिरिक्त सचिव दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती खेडेकर यांच्याबाबत दोन आठवड्यात अहवाल सादर करणार आहे. पूजा यांच्यावर जे आरोप झाले त्याबाबतची पडताळणी ही समिती करणार आहे. त्यामुळे आता पूजा खेडकर यांच्यावरील आरोप खरे की खोटे? याचा थेट सोक्षमोक्ष लागणार आहे. पूजा खेडकर यांच्याविरोधात वाहतूक पोलिसांची कारवाई पूजा खेडकर यांच्या बंगल्यात झाकून ठेवण्यात आलेली ऑडी कार पूजा या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्यासाठी वापरत होत्या. या कारवर त्यांनी महाराष्ट्र शासन अशी पाटी लावली होती आणि नारिंगी रंगाचा दिवा लावला होता. पोलिसांच्या मते हा वाहतूक नियमांचा भंग असून पोलिसांनी कलम १७७ अंतर्गत कारवाई करायचं ठरवलंय. त्यासाठी पुणे पोलीस पूजा खेडकर यांच्या बाणेर रस्त्यावरील बंगल्यासमोर गेले होते. यावेळी



पुजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांनी दरवाजा उघडण्यास नकार दिला. पुणे पोलिसांनी पूजा खेडकर यांना वॉट्सॲपवर नोटीस पाठवली आहे. या नोटीशीत MH -12 AR 7000 क्रमांकाच्या या गाडीचा उपयोग नियमबाह्य पद्धतीने करण्यात आल्याने तपास करायचा आहे, असं सांगत ही गाडी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याच्या वाहतूक विभागात जमा करण्यास सांगण्यात आलंय. जिल्हाधिकाऱ्यांच्या तक्रारीत वॉट्सॲप चॅटसह ताबा मारलेल्या केबिनचे फोटो दरम्यान, जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी पूजा खेडकर यांच्या तक्रारीचा अहवाल अप्पर सचिवांना पाठवला होता. 25 पानी अहवालात पूजा खेडकर यांनी केलेल्या डिमांडचा पाढा वाचला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर पूजा खेडकर यांची वाशीममध्ये बदली करण्यात आली होती. या 25 पानी अहवालात पूजा खेडकरांच्या वॉट्सॲप चॅटसह ताबा मारलेल्या केबिनचे फोटो देखील होते.

## घागरवाड्यात सर्वज्ञ करिअर अकॅडमी व भारतीय सेनेने केले ५००० रोपांच वृक्षारोपण



**किल्लेधारुर/प्रतिनिधी**

घागरवाडा येथे भारतीय सेनेच्या १३६ इको बटालीयन व केज येथील सर्वज्ञ करिअर अकॅडमीचे विद्यार्थ्यांनी पाच हजार वृक्षाची लागवड केली या उपक्रम उत्कृष्ट पध्दतीने राबवला केज येथील सर्वज्ञ करिअर अकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षक वृंदानी भारतीय सेनेच्या बि कंपनी १३६ इको बटालियन बरोबर धारुर तालुक्यातील घागरवाडा येथील वन विभागाच्या जमिनीत ५००० रोपांचे वृक्षारोपण केले. बी कंपनी १३६ इको बटालियन ची तुकडी भारतीय सेनेची पर्यावरण संवर्धन करणारी तुकडी आहे. ही बटालियन वर्ष २०२४-२०२५ मध्ये बीड जिल्ह्यात २२५००० रोपे लावून पर्यावरण संवर्धन व वनीकरण करणार आहे.ह्या प्रसंगी सर्वज्ञ करिअर अकॅडमी चे संचालक बांगर विद्यार्थी,घागरवाडा चे ग्रामस्थ, वन विभागाचे प्रादेशिक वन अधिकारी शयु एच चिकटे,वन विभागाचे कर्मचारी,इको बटालियन चे कंपनी कमांडर ले कर्नल अमित प्रभू, सुभेदार मोरे, सुभेदार दिवेकर, हवालदार सोमवसे, नायक शेख व इतर सैनिक उपस्थित होते.

## जरांगे पाटलांच्या मराठा शांतता रॅलीला गेवराई तालुक्यातून हजारो मराठा उपस्थिती

## बदामराव पंडितांकडून जेवणाची व्यवस्था

गेवराई/प्रतिनिधी

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या बीड येथील मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीसाठी गेवराई तालुक्यातून हजारो मराठा समाज बांधव वाजत गाजत सहभागी झाले होते. दरम्यान शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यावतीने पाडळसिंगी येथे रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्व समाज बांधवांसाठी भोजन व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या आरक्षणाचा लढा देत असून राज्य सरकारला आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी 13 जुलै 2024 ची मुदत दिल्यानंतर त्यांची मराठवाड्यात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली सुरू आहे. या रॅलीच्या स्वागतासाठी गेवराई तालुक्यातील ठिकाणी मनोज जरांगे पाटलांचे मोठमोठे बॅनर, कट आउट आणि स्वागत कमान लावण्यात आले होते. त्यासोबतच रस्त्याच्या दुतर्फा भगवे ध्वजही लावण्यात आले होते. दिनांक 11 जुलै रोजी बीड येथे झालेल्या या विराट रॅलीत गेवराई तालुक्यातून हजारो मराठा समाज बांधव भगवे झेंडे लावलेल्या मोटरसायकल जीप, ट्रॅक्टर, जेसीबी, ट्रक, टेम्पो आदी वाहनांनी ढोलीबाजा, डफडे, ताशा वाजवत सहभागी झाले होते. यात महिलांचीही लक्षणीय




उपस्थिती होती. गेवराई ते बीड दरम्यान पाडळशिंगी टोलनाक्याजवळ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने जरांगे पाटलांच्या रॅलीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व समाज बांधवांसाठी भोजन व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या ठिकाणी माजी मंत्री बदामराव पंडित यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित व युवानेते यशराज पंडित यांनी समाज बांधवांचे स्वागत केले. बीड येथील रॅली संपल्यानंतर आपल्या गावी परत जाणाऱ्या मराठा समाज बांधवांच्याही भोजनाची व्यवस्था पंडित परिवाराकडून करण्यात आली होती. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत सावलीप्रमाणे उपस्थित राहणारे अंतरवाली सराटीचे सरपंच पांडुरंग तारक यांनी भोजन कक्षाला भेट देऊन समाधान व्यक्त केले. याप्रसंगी पत्रकारांसह गेवराईतील मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १८ जुलैला आषाढी वारी परतताना धारूर येथे पालखी मार्गावर वारक-याची आरोग्य तपासणी व भोजन व्यवस्थाचे आयोजन.

किल्लेधारूर /प्रतिनिधी धारूर येथे दि. १८ जुलैला गुरूवारी आषाढी वारी परतताना पालखी मार्गा वर वारक-याची आरोग्य तपासणी व भोजन व्यवस्थाचे आयोजन करण्यात आले असून दिवस भर हि सेवा सुरू राहणार आहे यांचा लाभ घ्यावा असे आवाहण या संयोजकानी केले आहे.

आषाढी वारीला पालख्या पायी जात असताना या भावीकाची मोठ्या प्रमाणात सेवा केली जाते माञ आषाढी परतताना या भाविकाना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. धारुर येथून शेगाव पंढरपुर हा पालखी मार्ग झाल्या पासून विदर्भ, जालना, परभणी, हिंगोली आदी जिल्ह्यातील भावीक वर्ग जाताना परतीला हा मार्ग वापरतात या भावीकाची सोय व्हावी या साठी धारूर शहरातील युवक आषाढी वारीहून परतणा-या भावीकांची सोय गेल्या आठ वर्षा पासून करतात या वर्षी भोजना बरोबरच या वारक-याची गरज लक्षात घेऊन आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत केले असून धारूर ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. शशांक वाघमारे यांचे पथक वारक-यांची आरोग्य तपासणी करणार असून दि.18 जुलै रोजी या पालखी मार्गा लगत असणा-या जाधव मंगल कार्यालयात दिवस भर हे दोन्ही उपक्रम राबवण्यात येणार असून वारक-यानी या दोन्ही उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहण या उपक्रमाचे संयोजकानी केले आहे.

## माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घेतले सहकार्यासमवेत पंढरपुरात विठुरायाचे दर्शन

**नांदेड/प्रतिनिधी** गेल्या १९ वर्षापासून सातत्याने पंढरीची वारी न चुकलेले नांदेड जिल्ह्याची लोकप्रिय खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सहा जुलै रोजी आपल्या सहकार्यासमवेत विठुरायाचे पंढरपूर येथे मनोभावाने दर्शन घेतले. नांदेडचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कुटुंबीय पंढरपूरच्या विठुरायाची पूर्वीपासूनच कट्टर भक्त आहेत त्यांचे वडील शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर हे सुद्धा वारकरी संप्रदायातील असल्याने त्यांच्याच प्रेरणेतून दरवर्षी मा. खासदार प्रतापराव पाटील आषाढी एकादशी दरम्यान पंढरपूर येथील विठ्ठल रुक्माई दर्शनासाठी जातात शनिवारी सहा जुलै रोजी मा.



खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पंढरपूर येथे जाऊन विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले त्यांचा पंढरपूर येथील देवस्थान समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांच्या समवेत माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील सावळे, विनायकराव पाटील शिंदे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य दिलीप सोनटक्के, सुरेश राठोड, उद्योजक गुलाब शुक्ला, बाळासाहेब निरस, आपलं नांदेडचे संपादक शिवराज पाटील गाडीवान, अशोक पाटील वडजे, स्वामी, बळी पाटील जानापुरीकर यांच्यासह अनेकांनी प्रतापराव पाटील चिखलीकरांसोबत विठुरायांचे दर्शन घेतले. आषाढी वारी दरम्यान खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विठुरायाचे सर्व सहकाऱ्यांना दर्शन घडवून आणल्याने अनेकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## धारूर तहसिलवर सीटू कमिटीच्या वतीने विविध मागण्यांसाठी निदर्शने व मोर्चा .

**किल्ले धारूर/प्रतिनिधी** दि. १० जुलै २०२४ रोजी शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भात सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनस् सीटू बीड जिल्हा कमिटीच्या वतीने धारूर तहसिलवर निर्देशने व मोर्चा काढण्यात आला . असे दिलेल्या प्रशिद्धी पत्रकात सीटू संघटनेचे बीड जिल्हा सचिव कॉ डॉ अशोक थोरात यांनी माहिती दिली .

या बाबत सविस्तर असे कि , आज राज्यामध्ये सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स् या सीटू संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तहसिल कार्यालय या १०



जुलै हा कामगार संघटनेच्या वतीने मागणी दिवस म्हणुन या ठिकाणी मोर्चा व निर्देशने करण्यात आली त्याचाच भाग म्हणुन धारूर तहसिल वर शालेय पोषण आहार कामगाराच्या मानधनात वाढ करा , शालेय पोषण आहार कामगारांना किमान वेतन द्या ,विनाकारण विना चौकशी कामगाराना कामावरून कमी करू नका , अशा वर्क्स व गट पर्वतक यांना मानधन वाढ करा , बांधकाम कामगाराना ग्रामसेवक मार्फत ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्या , शालेय पोषण आहार , आशा वर्क्स व गट पर्वतक यांना शासकिय सेवेत कायम करा . इत्यादी सह अनेक मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना धारूर तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले .या .वेळी सीटू संघटनेचे जिल्हा सचिव कॉ डॉ अशोक थोरात , शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या जिल्हा कोषाध्यक्ष कॉं मीरा शिंदे , शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे तालुका अध्यक्ष कॉ लक्ष्मण डोंगरे , तालुका सचिव कॉ लता खेपकर , वैशाली अडसूळ , शोभाताई सोळंके , संजय घोगरे , शिवाजी अडसूळ , सर्जेराव पतंगे , किसन मुठाळ , गंगा फरताडे , इंदुताई खेपकर , सुकुमार वाघमारे , व्यंकटी काळे आशाताई देवकुळे , सुनिता डोईफोडे इत्यादी सह अनेक महिला व पुरुष या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते . या आदोलनाला शेतमजुर संघटनेच्या कॉ मनिषा करपे यांनी शुभेच्छा दिल्या .असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात बीड जिल्हा सचिव कॉ डॉ अशोक थोरात यांनी माहिती दिली .

# महाराष्ट्र कृषी क्रांतीचा जनक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार

## कृषी मंत्री धनंजय मुंडे पुरस्कार सोहळ्यात उपस्थित

## १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा पुरस्कार

## पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा, शाश्वत विकास धोरणांची दखल

**वादळवार्ता/मुंबई** : पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार आज प्रदान करण्यात आला. १५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या-२०२४ कॉंनक्लेव्हचे एग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश व केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल दखल घेत महाराष्ट्र राज्याला सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, एग्रीकल्चर टुडे समूहाचे अध्यक्ष डॉ. एम.जे. खान, राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल व इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील कृषी विकासाच्या विविध योजना आणि शाश्वत विकासासाठीच्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी माहिती देताना ते म्हणाले, महाराष्ट्र हे कृषी क्रांतीचं जनक राज्य आहे. महाराष्ट्रला हरित क्रांतीची समृद्ध परंपरा आहे आणि कृषी व शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची गौरवशाली परंपरा देखील आहे. राज्याचे प्रमुख म्हणून हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे.मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आलो असून हा पुरस्कार स्वीकारताना मला मोठा अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्याला कृषी क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्याच्या रूपात निवडल्याबद्दल 'एग्रीकल्चर टुडे' आणि परीक्षक मंडळाचे आभार मानत, हा पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचे कष्ट, मेहनत आणि मातीच्या प्रेमाचं ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारने त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्सुक आहेत आणि आम्ही प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करत असतो, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील. बदलत्या काळानुसार आणि हवामानातील बदल पाहता, आमचा शेतकरी सदैव जागरूक आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्र कृषी क्रांतीत अग्रेसर असल्याची माहिती दिली .युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले असून, होरपळीचे युग सुरु झाल्याचे आणि तातडीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्र सरकारने या आव्हानाला प्रतिसाद देत २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा आणि ५ टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने जगातील मानव जात वाचवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासनाने बांबू मिशनला प्राधान्य दिले असून, बांबू ही विशेष वनस्पती असल्याचे सांगत, बांबू पासून २००० प्रकारच्या वस्तू तयार याची माहिती होत असल्याची माहिती श्री. शिंदे यांनी यावेळी दिली. 'बांबू घास नही खास है' असे म्हणत बांबू मुळे पर्यावरण संवर्धन आणि अन्न सुरक्षा यावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत आणि त्यांना कर्जमाफीसाठी सहकार्य केलं आहे. तसेच, पीक विमा योजनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात देशातील पहिला मायक्रो मिलेट क्लस्टर सुरू केला आहे आणि सिंचन प्रकल्पांद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा ध्येय निश्चित केले आहे.राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचं ठरवले आहे आणि कपास व सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याचे माहिती दिली. राज्यातील कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णयांमुळे महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे. यामध्ये मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढ, पीएम किसान सन्मान निधी दुप्पट, नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण, तृणधान्यांना एमएसपी, हरित पट्टा निर्माण आणि सिंचन क्षमता वाढ यांचा समावेश आहे. बांबूविषयी राज्य सरकारकडून घेतलेल्या उपायांची केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडून कौतूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाकडून हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सुमारे १० लाख हेक्टर जमिनीवर बांबूची लागवड करण्याचा घेतलेला क्रांतिकारी निर्णय कौतुकास्पद आहे," असे केंद्रीय कृषिमंत्री श्री. चौहान यांनी कौतुक केले.






## 'मला दहाव्याला बोलवा, कावळ्याच्या अगोदर मी हजर राहीन', सुजय विखेंच्या विधानावर लंके काय म्हणाले?

"मला दहाव्याला बोलवा. कावळ्याच्या अगोदर मी हजर राहील, असं वक्तव्य करत आमचे मित्र पहाटे चारला लंगर तोडायला जातात", असा टोला माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार निलेश लंके यांचे नाव न घेता लगावला होता. यावर खासदार निलेश लंके यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. 13 तारखेला मतदान झालं आता मी त्यावर पडदा टाकला आहे. त्यांनी कुठलं वक्तव्य करावं हा त्यांचा अधिकार आहे. मात्र त्यांना उत्तर देणं माझ्या दृष्टीने योग्य वाटत नाही, असं निलेश लंके यांनी म्हटलं आहे. "आता मी मोकळाच आहे. मी ठरवलंय की एखादं उद्घाटन असेल, वाढदिवस असेल किंवा जागरण गोंधळ. हजर राहायचे. दहावा असेल तर लगेच सांगा, कावळ्याच्या आगोदर सुजय विखे हजर राहील. बदलेले राजकारण ओळखण्यात मी अयशस्वी ठरलो. मात्र लोकसभेनंतर मी खूप काही शिकलो", असे मिश्किल वक्तव्य सुजय विखे पाटील यांनी काल केलं होतं. त्यावर सुजय विखे यांनी प्रतिक्रिया देणं टाळलं आहे सुजय विखेंच्या वक्तव्यावर खासदार निलेश लंके यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. "13 तारखेला मतदान झालं. आता मी त्यावर पडदा टाकला आहे. त्यांनी कुठलं वक्तव्य करावं हा त्यांचा अधिकार आहे. मात्र त्यांना उत्तर देणं माझ्या दृष्टीने योग्य वाटत नाही", असं निलेश लंके यांनी म्हटलं आहे.

## बाळनाथ विद्यालय चाकरवाडी चे महाराष्ट्र प्रज्ञाशोध ( एम टी एस ) परीक्षेमध्ये यश..

**बीड/ प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा (MTS) सन २०२३/२४ स्कॉलरशिप परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सदर परीक्षेमध्ये चव्हाण उर्मिला शंकर, कांदे प्रियांका गोवर्धन, मोरे विश्वजीत नितीन, तांदळे सानवी गणेश, पवार शिवम कालिदास, कदम तृप्ती बाजीराव, शेळके भाग्यश्री कृष्णा, भोसले रेणुका किशोर, सावंत सागर रामचंद्र, सेंड कर कोमल दत्ता, कदम श्रुती अशोक, सावंत संतोष प्रभाकर, कुलगुडे किरण विनायक, भोसले संभाजी अशोक, कडवकर साक्षी नितीन, आनवणे वैष्णवी नारायण हे विद्यार्थी महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उत्तीर्ण झालेले आहेत. बाळनाथ विद्यालयातील एकूण 24 विद्यार्थी या परीक्षेसाठी बसलेले होते. त्यातील सोहळा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार



समारंभ आयोजित केला होता. विद्यार्थ्यांमध्ये प्रोत्साहन निर्माण व्हावे म्हणून शाळेच्या वतीने हा कार्यक्रम घेण्यात आला. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासक फाटक सर उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांचे पालक आणि पत्रकार अभिजीत पवार उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे प्रशासक प्रा. फाटक सर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की प्रत्येक पालकाला असे वाटते की आपले पाल्याने भविष्य घडवावे. पालकांनी पण आपल्या विद्यार्थ्यांकडे पाल्याकडे लक्ष दिले पाहिजे आपला पाल्य नेमक काय करतो, अभ्यास करतो का हे पहावे असे यावेळी बोलताना म्हटले. निश्चितच आपल्या शाळेला चांगले दिवस आहेत कारण की गेल्या काही दिवसांपासून एम टी एस, एन एम एम एस, एस एस सी, सारख्या अनेक परिक्षा मध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मान उंचावताना पाहिले आहे. बुद्धिमत्तेचा उपयोग आपण योग्य जागी योग्य वापर केला पाहिजे. समजतील चांगल्या गोष्टी आपण घेतल्या पाहिजे असे यावेळी संस्थेचे प्रशासक प्रा फाटक सर यांनी बोलताना म्हटले. यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दाईंगडे सर यांनी केले तर प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर आणि आभार फाटक सर यांनी मानले. हा सर्व कार्यक्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्यांनी पार पाडला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077